[illegible] - 21-22
ISSN.

ISSN 2278-8158

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# ROYAL

Volume - X Issue - II December - May - 2021-22

English / Marathi Part - II / Hindi

**Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
Journal No. 47037**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 5.756
www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

VOLUME - X, ISSUE - II - DECEMBER - MAY - 2021-22
ROYAL - ISSN 2278 - 8158 - IMPACT FACTOR - 5.756 (www.sjifactor.com) CC-12

# ९. महात्मा फुले यांचे धर्मविषयक विचार

डॉ. विक्रमराव नारायणराव पाटील
शंकरराव जगताप, आर्ट्स अॅण्ड कॉलेज, वाघोली, ता. कोरेगाव, जि. सातारा.

## प्रास्ताविक

महात्मा फुले यांचा जन्म सामान्य शेतकरी कुटूंबांत झाला. फुले यांचे वडीलांना जेमतेम अक्षर ओळख होती परंतु त्यांना आपला मुलगा खूप शिकावा असे वाटत असे परंतु आप्त स्वकीयांनी व शेजाऱ्यांनी त्यांचा हा विचार हाणून पाडला. प्राथमिक शिक्षणानंतर जोतीराव आपल्या वडिलासोबत शेतात काम करु लागले. जोतीराव यांची हुशारी पाहून उर्दू- फारशीचे विद्वान गफार बेग मुन्शी आणि ख्रिस्ती धर्मोपदेशक लिजिट साहेब यांनी जोतीरावांना पुण्यात स्कॉटिश मिशनच्या हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला तिथे त्यांना सदाशिव गोवंडे, मोरेवळेकर आणि सखाराम परांजपे हे मित्र भेटले त्या मिशनरी शाळेत फूले यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण झाली. शाळेमधील परधर्मी व मित्रकडून हिंदूधर्मावर झालेली टीका ऐकून फूले यांनी आपल्या धर्मातील अन्याय, उच्चनीच भेदभाव धर्माचरणातील मतलबीपणा यांची पहिल्या प्रथम जाणिव झाली. आपल्या धर्मसंस्थेचे अंतरंग न्यायनिष्ठतेने तपासून पाहण्याची त्यांना गरज भासू लागली. त्यातूनच त्यांनी हिंदूधर्माचा अभ्यास सुरु केला. जोतीराव फूले यांची धर्मकल्पना त्यांच्या इतर सर्व समकालीनांपेक्षा वेगळी होती. प्रत्येक माणसाने आपल्या बुद्धिचीच कसोटी वापरुन निर्णय घ्यावेत. सदसदविवेकाला न पटणारी कोणतीही गोष्ट करु नये अशी भूमिका त्यांनी घेतली.

सभोवतालीन समाजाची मानसिकता शोधण्याचा डोळस प्रयत्न त्यांनी केला. धार्मिक दृष्टीने समाजाशी संवाद करणे अशक्य आहे कारण समाजावर देव, धर्माचा प्रचंड मोठा प्रभाव होता. तत्कालीन कालखंडात वैज्ञानिक दृष्टीने विचार करण्याची कुवतच निर्माण झालेली नाही. प्राचीन कालखंडापासून भारतीय समाजाची जडणघडण धर्माच्या आधारे झाली आहे. येथील सर्व सामाजिक जडणघडण धर्माच्या आधारे झाली आहे. येथील सर्व सामाजिक व आर्थिक प्रश्नांच्या मूळ धार्मिक बाबी आहेत. पूर्वी कधी काळी प्रचलित झालेल्या धर्म कल्पना पुढे ज्ञानप्राप्तीनंतरही सुरु ठेवल्या. पोटासाठी पुरोहितांनी स्वार्थलालसे टिकवलेली कर्मकांडे, पूजा, नामस्मरण, नैवेद्य अन्नदान, अनुष्ठान, पुनर्जन्म, धर्मग्रंथाचे पावित्र्य उच्चवर्णीयांचे विशेषाधिकार आणि शुद्रांवर अन्याय निर्बंध लादणारे चातुर्वर्ण्य पद्धती अशा गोष्टीतून भट-ब्राम्हणांनी धर्माच्या नावाखाली लोकांचे शोषण केले. शिक्षण नाकारले स्त्रीया, मागासवर्गीय लोकांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात शोषण केले. अनेक दृष्टीनी जो धर्म भारतीयांच्या अध: पतनाला कारणीभूत झाला. तो दूर सारला पाहिजे तथापि खरा धर्म ते नाकारत नाहीत परंतु ब्राम्हणांनी त्याला जे विकृत रुप दिले ते त्यांना मान्य नव्हते. फूले यांनी हिंदूधर्मातील चूकीच्या सिद्धांतावर कठोर हल्ला चढविला त्या धर्मातील बहुतांश भाग त्यांनी नाकारला.

धर्मामधील असंख्य संकल्पना फूल्यांनी नाकारल्या त्याबरोबरच प्रत्यक्ष 'धर्म' हा शब्द वापरुनही त्यांनी अनेकदा धर्मावर टीका केली त्याचे दोष दाखविले अर्थात धर्माचे अनेक अर्थ होतात आणि धर्माच्या या अनेक अर्थांचा आपल्या सोयीनुसार लाभ उठविणे हे त्यांना आक्षेपार्ह वाटते म्हणूनच ते म्हणतात धर्म शब्दाचे नाना प्रकारचे अर्थ होत असल्यामुळे धूर्त भट्ट-ब्राम्हण आपली कार्ये साधून घेण्याकरिता जशी वेळ येईल तसा त्याचा अर्थ करुन आपले हित करुन घेतात.[1] फूले यांची धर्मकल्पना आपल्या सार्वजनिक सत्यधर्म ग्रंथात १८९० साली मांडली असली तरी चळवळीतून केल्या जाणाऱ्या प्रचाराच्या स्वरुपात ती १८५६ पासून मांडली जात होती. १८७३



4

साली सत्यशोधक समाजाची स्थापना केल्यापासून त्यांनी व्याख्यानसत्रे, लहानमोठे उपक्रम, छोटेखानी पुस्तिका विधायक प्रचार वगैरे माध्यमांतून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात तळागाळापर्यंतच्या जनसमुहात ती जोरकसपणे प्रस्तुत केली गेली होती. महात्मा फुले यांनी त्यांना अपेक्षित असलेल्या समाजजीवनाला आधारभूत ठरु शकेल अशा धर्मकल्पनेची उभारणी. प्रामाणिक धर्मभावना आणि समाजधुरिणाला लागणारी शुद्धनीती या दोहोंचा समन्वय त्यांच्या धर्मकल्पनेत झालेला दिसून येतो. 'स्वार्थी भटशाहीवर हल्ले, कर्मकांडाचा भांडाफोड, प्रचलित विधीच्या ऐवजी करावयाच्या पर्यायी विधींचा प्रचार, आप्पलपोटया तंत्रमंत्रकर्त्यांनी, बुवा बाबामहाराजांनी व फलज्योतिषवाल्यांनी पिकवलेल्या भयगंडातून जनसामान्यांची सोडवणूक, सत्यशोधक विवाह विधीद्वारे पुरोहितशाहीचे उच्चाटन, शुद्रातिशुद्रांच्या मनात आत्मविश्वास व हक्काविषयी जाणीव यांचे बीजारोपण, स्त्री-शुद्रादिकांत शिक्षणप्रसार अशा नाना स्वरूपात त्यांची धर्मकल्पना अविष्कृत होत होती. डिवचलेल्या पुरोहितवर्गाने त्यांच्याविरूद्ध कोर्टकचेऱ्या केल्यामुळे अनि धर्मस्वातंत्र्याच्या हक्काखाली आपले धार्मिक विधी स्वतः करण्याचे लोकांचे स्वातंत्र्य १८९० साली हायकोर्टानेच मान्य केल्यामुळे तर लोकांमध्ये या प्रश्नावर विलक्षण जागृती झाली होती.[3] कर्मकांडात्मक अंधश्रद्धात्मक आणि सर्वांगिण गुलामगिरीचे व अज्ञानमूलक होते. अनिष्ट रुढी, परंपरांचा जिथे सुळसुळाट होता. पुरोहितवर्गाला लाभ आणि स्त्री-शुद्रातिशुद्रांना सर्वतोपरी असहाय्यता ही विषम वाटणी तावडतोब बदलणे अगत्याचे होते. धार्मिक क्षेत्रातील अराजकता आणि दररोजच्या जगण्यातील दुरावस्था यांच्यातील अंतरसंबंध स्पष्टपणे लोकांच्या लक्षात आणून देण्याची गरज होती. पारंपारिक धर्माने त्यांचे शोषण व अगतिक मानसिकता घडविली होती. ती बदलणे व त्यांच्यात आत्मभान आत्मविश्वास व डोळसपणा जोपासणे गरजेचे आहे. पारंपारिक धर्माने खच्ची केलेल्या त्यांच्यातल्या मानवी संघटनशक्तीचे व कृतीप्रवणतेचे पुनरूज्जीवन केले जाणे निकडीचे होते. तेच खऱ्या अर्थाने फुलेंचे महत्वाचे ध्येय होते.

आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक सत्तेच्या सूत्रधारांनी लोकांना गुलाम करण्यासाठी ज्या धार्मिक व्युहनीतीचा वापर प्रभावीपणे केला होता. तीच त्यांची नीती बदलण्याचा प्रयत्न जोतीरावांचा होता. चालत आलेल्या धर्मावर प्रहार करून हे सारे साध्य होणार नव्हते तर त्यासाठी पर्यायी धर्मकल्पनाच देणे त्यासाठी आवश्यक होते. जगातल्या प्रत्येक धर्मसंस्थात्मक पूर्ण सत्य सापडल्याचा दावा करीत असला तरी कोणताच धर्म परिपूर्ण सत्य सांगत नाही. यासाठी त्यांनी पर्यायी धर्मविचार सार्वजनिक सत्यधर्म या पुस्तकात मांडला. संपूर्ण मानवमात्रासाठी एकच असलेला सार्वजनिक सत्यधर्म आचरणारा समाज हेच त्यांचे अंतिम साध्य होते. एकाच निर्मिकाने निर्माण केलेल्या मानवमात्राला सार्वजनिक सत्यधर्माशिवाय अन्य तरणोपाय नाही. 'सार्वजनिक सत्यधर्म' या शब्दसमूहात धर्माला लावलेली सार्वजनिक व सत्य ही दोन्ही विशेषणे महत्त्वाची आहेत. फूल्यांचा धर्म वैदिक धर्माप्रमाणे मोजक्या लोकांपुरता मर्यादित नसून तो सर्व लोकांना उपलब्ध आहे आणि तो वैदिक धर्माप्रमाणे विषमता शोषण, कृत्रिमता इ. असत्य मूल्यांवर आधारलेला नसून सत्यस्वरूपी आहे हे त्यातून सूचित होते.[4] फूल्यांनी अत्यंत श्रद्धेने ईश्वराचे अस्तित्व अस्तित्व मानले आहे. परंपरागत धर्मामधील विविध संकल्पना नाकारत असताना अशा प्रकारे ईश्वराचे अस्तित्व मानणे हा कोणत्याही प्रकारे डावपेचाचा प्रकार नव्हता. ईश्वराचे वर्णन करण्यासाठी त्यांनी परंपरेने आलेल्या ईश्वर, देव, परमात्मा इ. शब्द वापरले असले तरी त्यांनी स्वतः ईश्वराचा द्योतक म्हणून निर्मिक हा एक नवीनच शब्द तयार केला. जगातील विविध वस्तू निर्मिकाने मानवासाठी निर्माण केल्या असून त्याने त्यांच्या समान रीतीने उपभोग घेण्याची सर्व मानवांना मोकळीक दिली आहे.

महात्मा फुले यांनी सत्यधर्म, विश्वधर्म सांगताना धर्माचा सकारात्मक संदर्भात अर्थ सांगतात. एकेश्वरनिष्ठा, शुद्ध स्वरूपातच केली जाणारी निर्मिकाची आराधना श्रद्धेला विवेकाचे अधिष्ठान नीतिनिष्ठ धर्माचरण, सत्यमुल्यांचे संस्कार इत्यादी बाबीवर त्यांनी भर दिला

आहे. धर्मामध्ये सांप्रदायिकतेला मुळीच स्थान नाही. धर्म कोणत्याच एका समूहाची मिरास नाही काहींना विशेषाधिकार आणि इतरांची नागवणूक ही विषमता त्याला मान्य नाही. दुराग्रह, मत्सर वा गुलामी यांपैकी ते कशालाच थारा देत नाहीत.

### निष्कर्ष

महात्मा फुले यांनी भारतात प्राचीन कालखंडापासून धर्माच्या नावाखाली अस्पृश्य, स्त्रीया, गरीब, शेतकरी यांचे कशाप्रकारे शोषण भारतात केले जात होते, या विषयी सविस्तर विवेचन केले आहे. निसर्ग हा जन्मतःच कोणाचाही भेदाभेद करीत नाही. परंतु भारतामध्ये जात-धर्माच्या नावाखाली त्यांना गुलाम करून त्यांचे शोषण केले. जन्म, लग्न, घरभरणी, पोथ्या मृत्यू अशा सर्व प्रसंगी अडून धूर्त व मतलबी पुरोहित शूद्रांना कसे नागवतात यांचे सोदाहरणासहीत विश्लेषण केले आहे. यावर पर्याय म्हणून महात्मा फुलेंनी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहून लोकांनी कशाप्रकारे विज्ञानवादी विचार अंगीकारले पाहिजेत याचे विश्लेषण केले आहे. लोकांना जन्मापासून मृत्यूपर्यंतचे विधी कसे करावेत यासंबंधीच्या पुस्तिका सत्यशोधक समाजाने प्रस्तुत केल्या आहेत.

गौतमबुद्ध, संत कबीर, संत तुकाराम महाराज ह्यांचा विचारांचा प्रभाव जोतीराव फुले यांच्यावर झाला. ब्राम्हण धर्माच्या विळख्यात सापडलेल्या हिंदू धर्माला पुनरुज्जीवीत करण्याचा प्रयत्न फुले यांनी केला आहे. जवळपास १३0 वर्षापूर्वी फुलेंनी हिंदू धर्मातील अंधश्रद्धा, कर्मकांड यावर प्रहार केला आज २१ व्या शतकातही भारतातील अनेक सुशिक्षित, उच्चशिक्षित लोक अंधश्रद्धा कर्मकांडाच्या आहारी जाताना दिसतात त्यातूनच भारतात बुवाबाजी लूट शोषण या गोष्ट घडताना दिसतात. २१ व्या शतकात महात्मा फुलेंच्या सार्व जनिक सत्यधर्मावर आधारित धर्मपालन व्यक्तीने केले पाहिजे तरच खऱ्या अर्थाने विज्ञानवादी भारत

निर्माण होईल महात्मा फुलेंच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार स्त्रीया, तरुण, उच्चशिक्षित यांच्यामध्ये करणे गरजेचे आहे.

### संदर्भ ग्रंथ

१. साळुंखे अ.ह. - महात्मा फुले आणि धर्म, लोकवाड्मय गृह, एप्रिल १९९२,मुंबई, पृ.क्र.३४
२. पाटणकर अरुण(संपा.) - लोकराज्य, भोळे भा.ल. जोतीरावांची धर्मकल्पना, प्रकाशक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, पृ.क्र.१५
३. साळुंखे आ.ह.- महात्मा फुले आणि धर्म, लोकवाड्मय गृह, एप्रिल १९९२,मुंबई, पृ.क्र.६२

### संदर्भ यादी

१. पाटणकर अरुण, - 'लोकराज्य' जोतीराव फुले विशेषांक, प्रकाशक, माहिती संचालनालय, मुंबई, फेब्रुवारी १९९१.
२. साळुंखे आ.ह.- महात्मा फुले आणि धर्म, लोकवाड्मय गृह, एप्रिल १९९२,मुंबई
३. साळुंखे पी.बी. (संपा)- महात्मा फुले गौरव ग्रंथ, प्रकाशक, महाराष्ट्र राज्य, शिक्षण विभाग मंत्रालय,मुंबई, जुलै १९८२
४. भोळे भा.ल.- आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे अॅण्ड पब्लिशर्स, नागपूर, जून २00३
५. सरदार ग.बा.- महात्मा फुले व्यक्तित्व आणि विचार, ग्रंथाली प्रकाशन,मुंबई, १९८१



5